**<u>प्रेस नोट</u> <u>दिनांक ०५/०३/२०१९</u>**

**<u>चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर</u>**

चंदननगर पो.स्टे. चे हद्दीमध्ये राहाणारे श्री. सुरज सुधाकर पुंड, रा.आणंदपार्क, लेन नं. १ स.नं. ४९, भारती कॉलनी, वडगांवशेरी, पुणे यांना त्यांचे गावी रु. १०,०००/- पाठवायचे असल्याने त्यांनी दिनांक २१/०२/१९ रोजी सकाळी १०.३० वाजता पेटीएमव्दारे पैसे ट्रान्सपर केले होते. परंतु पैसे ट्रान्सपर करतांना चुकून दुसया पेटीएमवर ट्रान्सपर झाले होते. चुकीचे पेटीएमवर पैसे ट्रान्सपर झालेचे त्यांना समजलेने त्यांनी सदर दिवशी सायंकाळी १९.०० वा. चे सुमारास चंदननगर पोलीस ठाणेचे सायबर पथकामधील कर्मचारी पोशि. ८५६४, पालांडे व पोशि. ८७९१, राहुल इंगळे यांची भेट घेवुन त्यांना सदर प्रकार सांगितला. नमुद कर्मचारी यांनी तात्काळ सदर पेटीएमला चंदननगर पोलीस ठाणे येथुन ईमेलव्दारे मेसेज पाठवुन माहिती कळवुन, श्री. सुरज सुधाकर पुंड यांचे रु. १०,०००/- त्यांना परत मिळवुन (रिफंड) दिलेले आहेत.

श्री. सुरज सुधाकर पुंड यांचे रु. १०,०००/- चुकीचे पेटीयमवर ट्रान्सपर झाल्याने ते अत्यंत चिंतातुर व दुखीः झालेले होते. पैसे गेल्याने त्यांचे चेहयावर तणाव जाणवत होता. परंतु त्यांचे पैसे त्यांना परत मिळवुन दिल्याने त्यांना आनंद होवुन, त्यांनी नमुद पोलीस कर्मचारी यांचे आभार मानुन पोलीस खात्याबद्यल आदराची भावना निर्माण झालेबाबत मनोगत व्यक्त केले आहे.

सदरची चांगली कामगिरी चंदननगर पोलीस ठाणेचे पोशि. पालांडे व पोशि. राहुल इंगळे यांनी केलेली आहे.